"मराठवाडा क्षेत्रातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी
आणि वृक्ष लागवडीचे संरक्षण व संगोपन करिता
केंद्रीय संरक्षण मंत्रालयामार्फत मराठवाडा
विभागात ईको-बटालियन स्थापन करणे.
नवीन लेखाशिर्ष सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सावनि-२०१७/प्र.क्र.४१/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १२ जुलै, २०१७.

वाचा - शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : -सावनि-२०१६/प्र.क्र.१२९/फ-११, दि, १३.१०.२०१६.

प्रस्तवाना -

मराठवाडा विभागात इको-बटालियन अंतर्गत प्रथम टप्प्यात एका कंपनीची व त्यानंतर अनुभवांती अधिक कंपन्यांची स्थापन टप्प्या-टप्प्याने करण्यासाठी केंद्र शासनास सविस्तर प्रस्ताव पाठविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

तसेच इको-बटालियन ची निर्मिती झाल्यानंतर, त्यांच्यामार्फत करण्यात येणारी वृक्ष लागवड, संगोपन आणि देखभाल इत्यादी कामांनुसार निधीची प्रतिकृती करण्यासाठी आवश्यक ती तरतूद सन २०१७-१८ पासून त्या त्या अर्थसंकल्पात किंवा पुरवणी मागणीद्वारे करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार "मराठवाडा विभागात इको-बटालियन स्थापन करणे" या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

"मराठवाडा विभागात इको-बटालियन स्थापन करणे" ही नवीन योजना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येईल. यासाठी होणाऱ्या खर्चाकरिता खालील प्रमाणे नविन लेखाशिर्ष सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

मराठी लेखाशिर्ष :-	इंग्रजी लेखाशिर्ष
महसूल व वन विभाग मागणी क्रमांक सी-७ प्रधान लेखाशिर्ष-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२- पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन संरक्षण ११०, वन्यजीवांचे संवर्धन (००) (२६) इको-टास्क फोर्स बटालियन स्थापन करणे ०१- वेतन ०२- मजूरी २१- पुरवठा व सामग्री ५० - इतर खर्च इको-टास्क फोर्स बटालियन स्थापन करणे संगणक संकेतांक क्रमांक.....२४०६ A२११	Revenue & Forest Department Demand No. 07 Major Head-2406- Forestry and Wildlife, 02- Environmental Forestry and Wildlife, 110- Wildlife preservation (00)(26) Establishment of Eco Task Force Battalion 01- Salary 02- Wages 21- Material Supply 50- Other Charges Establishment of Eco Task Force Battalion Computer Code No......2406 A211

सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक: १११०/ कार्यासन-१४७५ दिनांक १५.०३.२०१७, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४३/अर्थ ६, दि. १.०६.२०१७ आणि महालेखापाल-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक TM/Gr.III/U.O.R. ११/I/४०-३०, दि. ०७.०७.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०७१२१४५१३८२०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Atul Ashok Kode
Date: 2017.07.12 14:48:35 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)

प्रत,

१. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
६. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई४०० ०३२.
९. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१०. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२
११. नियोजन विभाग, कार्यासन १४३४, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. कार्यासन अधिकारी, फ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. निवडनस्ती/फ-११.